# लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात 'संविधान दिन' विविध उपक्रमांद्वारे साजरा

दोडामार्ग, २८ नोव्हेंबर (वार्ताहर)-येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात 'संविधान दिन' विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. यानिमित्त राज्य घटनेविषयी माहिती दर्शविणाऱ्या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन, निबंध स्पर्धा, संविधानातील नागरीकरणाचे मुलभूत हक्क व कर्तव्ये यांच्या वाचनाबरोबरच मान्यवरांच्या व्याख्यानाद्वारे हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देशिकाचेही सामुदायिक वाचन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील होते.

भित्तीपत्रकाद्वारे भारतीय संविधानातील महत्वपूर्ण दस्तऐवज मौलिक व फोटोंचे दर्शन विद्यार्थ्यांनी घडविले. या भित्तीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए. पाटील यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सायली संत्यवान गवस हिने प्रथम, पौर्णिमा अशोक वराडकर हिने द्वितीय, विद्या रमेश धर्णे हिने तृतीय तर निकिता नारायण गवस या विद्यार्थीनीने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविले. महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणामध्ये त्यांना गौरविण्यात येणार आहे. त्यानंतर भारतीय संविधानातील मुलभूत हक्क, कर्तव्ये व भारतीय घटनेची वैशिष्ट्ये यांचे सार्वजनिक वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाबद्दल आदर राखून व घटनेचे पालन करुन त्या मार्गाने चालण्याची शपथ देण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना संविधानची माहिती प्राप्त व्हावी म्हणून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.डॉ.एस.यु.दरेकर, प्रा.दिलीप बर्वे यांनी मौलिक विचार मांडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. ए.पाटील यांनी भारतीय घटनेत प्रतिबिंबित झालेल्या इंग्लंड, अमेरिका, फ्रान्समधील घटनात्मक चळवळी, तेथील राज्यदूत्या व राज्यघटना यातील अद्यत तत्वे याचा आढावा घेऊन, भारतीय घटनेने देशातील प्रत्येक नागरीकांना स्वातंत्र्य, समता व बंधूभाव यामध्ये बांधून ठेवले आहे. त्यामुळे या घटनेचे मूल्यं अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.पी.डी.गाथाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.प्रशांत ढेपे यांनी मानले.